**राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे येथील उप सचिव पद सह सचिव संवर्गात श्रेणीउन्नत करण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.साप्रवि- १२०२२/२/२०२६- माहिती (कक्ष-६ )**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दि. २९ एप्रिल, २०२६

**संदर्भ** :-१) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. रामाआ-२०१७/ प्रकरण क्र. १०/ सहा- दि. २१ जून, २०२३

२) सा.प्र.वि. शासन पुरकपत्र क्र. साप्रवि-१२०२२/ १५/ २०२५, दि. ३१ जुलै, २०२५.

३) सा.प्र.वि. शासन आदेश क्र.ससप/ ११२५/ प्र.क्र.१०१/ प्रशा १/ दि. १३ मार्च, २०२६.

**शासन निर्णय :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील शासन आदेशान्वये राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे येथील उप सचिव या पदावर मंत्रालयीन संवर्गातील श्री. श्रीनिवास ज. शास्त्री, सह सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने नियुक्त अधिकाऱ्याची वेतनश्रेणी विचारात घेता राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे येथील उप सचिव (वेतनश्रेणी एस-२५ : ७८८००-२०९२००) हे पद, तात्पुरत्या स्वरुपात सह सचिव (वेतनश्रेणी एस-२७ : १२३१००-२१५९००) या संवर्गात श्रेणीउन्नत करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर श्रेणीउन्नयन हे श्री. श्रीनिवास ज. शास्त्री, सह सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या प्रतिनियुक्ती कालावधीसाठी म्हणजे तीन वर्षांच्या कालावधीपुरते अथवा शासन पुढील आदेश देईपर्यंत, यापैकी जे आधी असेल तेव्हापर्यंत लागू राहील. सदर श्रेणीउन्नयनामुळे निर्माण होणारा अतिरिक्त वित्तीय भार संबंधित मंजूर लेखाशीर्षांतर्गत भागविण्यात येईल.

३. सदर श्रेणीउन्नयन हे व्यक्तीनिष्ठ स्वरुपाचे राहील व यामुळे स्वतंत्र कायमस्वरूपी सह सचिव पद निर्मित झाल्याचे समजण्यात येऊ नये. प्रतिनियुक्ती समाप्तीनंतर सदर पद पूर्ववत उप सचिव (वेतनश्रेणी एस-२५:७८८००-२०९२००) संवर्गात राहील, याबाबत स्वतंत्र आदेशाची आवश्यकता राहणार नाही.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र १११ / सेवा-९, दिनांक २७/०४/२०२६ द्वारे प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२९१६४२१८२२०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GOVIND BHASKAR PAWAR

Digitally signed by GOVIND BHASKAR PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=e50725cce3a4dbca1ff0b93de0fc66c6213931bf46e664186b931f73ce77f59a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E94393E3D129C252C23019C92DBF605A776527CA0D582055C5ED0AD6F66EE775, cn=GOVIND BHASKAR PAWAR
Date: 2026.04.29 16:43:29 +05'30'

**( गोविंद पवार )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. सचिव, राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे.
३. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८. श्री. श्रीनिवास ज. शास्त्री, सह सचिव. राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे
९. कार्यासन-६, संग्रहार्थ.